**इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मुंबई-४०००३२.
दिनांक : १३ डिसेंबर, २०२३

**वाचा :-**

१. इमाव, सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग,शासन निर्णय क्रमांक : इमाव-२०१६/प्र.क्र.५८/विजाभज-१, दिनांक ३०/१/२०१९
२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२,दिनांक २७/११/२०१८.
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१६ प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दिनांक ०६/०१/२०१७.
४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१८/प्र.क्र.३१९/शिक्षण-२, दिनांक २१/१२/२०१८
५. इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग विमुक्त जाती भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन निर्णय क्र. धवगृ-२०१९/प्र.क्र.१२६/मावक,दि.०६/०९/२०१९
६. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४)/बांधकामे , दि.३०/१०/२०२३
७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे पत्र क्रमांक सान्यावि-२०२३/प्र.क्र.६६/बांधकामे , दि.०८/१२/२०२३

**प्रस्तावना -:**

वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक खर्चासाठी अनुदान देण्याबाबत राबविण्यात येणाऱ्या आदिवासी विकास विभागाच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम व सामाजिक न्याय विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता योजना सुरु करण्यास मा मंत्रिमंडळाने दि.१९.१०.२०२३ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता दिली आहे.

त्यानुसार, सदर बैठकीत विविध विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, वसतिगृह व वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता, स्वाधार, स्वयंम अशा विविध प्रकारच्या योजनांमध्ये तसेच यापुढे प्रस्तावित करण्यात येणाऱ्या योजनांमध्ये एकसमानता रहावी यासाठी सर्वंकष धोरण निश्चित करण्याबाबत संदर्भाधिन क्र.६ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयान्वये मा.अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.१२.२०२३ रोजी आयोजित बैठकीत झालेल्या निर्णयानुसार इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले

/घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून), आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योजना लागू करणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -:**

आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थ्यांकरिता "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर योजनेंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे निश्चित केल्यानुसार विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरीत करण्यात यावी.

| अ.क्र. | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्ह्याचे ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० | २३,००० |
| २ | निवास भत्ता | २०,००० | १५,००० | १२,००० | १०,००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,००० | ८,००० | ६,००० | ५,००० |
| **प्रती विद्यार्थी एकूण संभाव्य वार्षिक खर्च** | | **६०,०००** | **५१,०००** | **४३,०००** | **३८,०००** |

०३. सदर योजनेसाठी रु.१०० कोटी इतक्या वार्षिक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

०४. सदर योजनेंतर्गत लाभार्थी निवडीचे निकष व इतर अनुषंगिक बाबी संदर्भात स्वतंत्ररित्या शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

०५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०९१/२०२३/व्यय-१४, दि.१३.११.२०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३१२१३१६४५४१५७३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशा नुसार व नावाने,

DINESH ROHIDAS CHAVAN

Digitally signed by DINESH ROHIDAS CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C2377ED235498603821D49922A210871FF6FB9B369722AC707AEE7DCD87F2BD, cn=DINESH ROHIDAS CHAVAN
Date: 2023.12.13 16:47:11 +05'30'

**(दिनेश चव्हाण)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
६) मा. मंत्री (इ.मा.ब.क.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
११) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
१२) सर्व प्रादेशिक उपायुक्त, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
१३) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण, सामाजिक न्याय विभाग.
१४) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
१५) निवासी लेखा परिक्षक, मुंबई.
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१८) निवड नस्ती (योजना-५)